epaper.सामना.com
साठी येथे क्लिक करावे.
epaper.saamana.com

ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक
सामना
संपादक : बाळ ठाकरे
ISO 9001:2000



सामना उत्सव रविवार पुरवणी
गुरुजी
शोध

Finance Updates
Get Updates on Top Gainers,Losers on Guruji Finance.Click Now!
finance.guruji.com

# लक्ष्मीची पावलं!



लक्ष्मी घरी येताना ती सुस्मित वदनाने यावी असे आवाहन श्रीसूक्ताच्या रचनाकारांनी केले आहे. सौंदर्याचे अत्युच्च लक्षण असणारे सुहास्य मुखावर विलसत असणारी सदानंदी लक्ष्मी इथे अपेक्षित आहे.

अश्विन अमावस्या हा लक्ष्मीपूजनाचा दिवस. लक्ष्मीचे प्रतीक म्हणून घरातील सोनेचांदीची पूजा करण्याचा प्रघात आहे. जनसामान्यांत 'लक्ष्मी'चा रूढ अर्थ म्हणजे धन किंवा वित्त. परंतु अध्यात्मशास्त्रात 'लक्ष्मी' याअर्थी केवळ धनाची श्रीमंती अपेक्षित नाही. प्रत्येक मनुष्य सुखसमृद्धीच्या प्राप्तीसाठी सदैव धडपडत असतो. आयुष्याच्या प्रत्येक क्षणी किमान वेळेत आणि किमान श्रमात जास्तीत जास्त सुख कसे मिळवता येईल याचा विचार करीत असतो. हे सुख म्हणजे नेमके काय याचा विचार प्राचीन काळापासून हिंदू संस्कृतीने केलेला आहे. आपल्या ऋषी-मुनींनी सुखाचे दोन प्रकार सांगितले आहेत. पहिला प्रकार म्हणजे प्रापंचिक सुख ज्यामध्ये सत्ता, यश, ऐश्वर्य, धन, विवाहसुख, संततीसुख इत्यादींचा समावेश होतो. दुसरा प्रकार म्हणजे आध्यात्मिक सुख किंवा पारमार्थिक सुख. प्राचीन वेदोक्त विचारसरणीने, प्रापंचिक सुख कोठेही न नाकारता, आध्यात्मिक प्रगतीला सहाय्यक म्हणूनच त्याचा स्वीकार केलेला आढळतो. म्हणूनच, या दोन्ही सुख प्राप्तीचे मार्ग भिन्न असले तरी आपल्या संस्कृतीने या दोन मार्गांचा सुवर्णमध्य गाठण्याचा प्रयत्न केला आहे. हा सुवर्णमध्याचा मार्ग म्हणजे दोन्ही सुखांची प्राप्ती करून देण्याची शक्ती असणाऱ्या 'श्री'ची आराधना. उच्च मानवी मूल्यांना अनुसरून, जीवनामध्ये जे जे काही उत्तम, उदात्त, उत्कृष्ट असे आहे, ज्यात मुख्यत्वे मनाच्या श्रीमंतीचाही समावेश होतो, त्या सर्व प्रकारच्या वैभवाला 'श्री' असे वेदांनी म्हटले आहे. केवळ एक व्यक्ती नव्हे तर संपूर्ण समाज अशा सर्व 'श्रीं'नी युक्त व्हावा, म्हणून 'श्री' आराधनेसाठी ऋग्वेदाच्या परिशिष्टामध्ये आढळणारे श्रीसूक्त रचले गेले. या श्रीसूक्ताचा मथितार्थ असा आहे की, 'मला उत्तम प्रापंचिक सुख मिळावे ज्याचा वापर मी पारमार्थिक सुख प्राप्तीसाठी करीन.' संसारी मनुष्याने प्रापंचिक सुख मिळविण्याच्या प्रयत्नात कोणतीही न्यूनता ठेवू नये पण त्याबरोबरच पारमार्थिक सुख मिळविण्याचा प्रयत्न करावा व 'श्री'मान बनावे, हा या आराधनेतला मूळ गाभा आहे. याचा पुनरोच्चार समर्थ रामदासस्वामींनी दासबोधात केलेला आढळतो.

श्रीसूक्तामध्ये 'अनपगामिनीम' अशा लक्ष्मीला आवाहन केले आहे, म्हणजे अशी लक्ष्मी जिला साधकाकडे फक्त येण्याचा मार्ग आहे, जाण्याचा मार्ग नाही अशी चिरकाल टिकणारी लक्ष्मी! या आवाहनाचा पुढचा महत्त्वाचा भाग म्हणजे प्राप्त झालेली लक्ष्मी टिकण्यासाठी काही अटींचे पालन करण्याचे आश्वासन देणे. यातली प्रथम अट म्हणजे येणाऱ्या लक्ष्मीचा ओघ टिकविण्यासाठी 'सत्पात्री' दानाच्या त्यागरूपाने तिचा जाण्याचा मार्ग अबाधित ठेवणे. सारांशाने श्री आराधना करणाऱ्या साधकाने समाजाच्या हितासाठी नि:स्वार्थ भावनेने धनाचा त्याग करणे अपेक्षित आहे जेणेकरून त्याग आणि भोग (प्राप्ती) याचे चक्र सतत फिरते राहील.

लक्ष्मी घरी येताना ती सुस्मित वदनाने यावी असे आवाहन श्रीसूक्ताच्या रचनाकारांनी केले आहे. सौंदर्याचे अत्युच्च लक्षण असणारे सुहास्य मुखावर विलसत असणारी सदानंदी लक्ष्मी इथे अपेक्षित आहे. भ्रष्ट मार्गांनी बळजबरीने आणलेली, रडत खडत येणारी लक्ष्मी इथे अपेक्षित नाही. अशी लक्ष्मी येते खरी परंतु टिकत मात्र नाही. कुमार्गाने लक्ष्मी मिळविण्यासाठी धडपड करणारा मनुष्य कित्येक वर्षे धनाच्या मागे धावत राहतो आणि जीवनातल्या गृहसौख्य, विवाहसौख्य, संततीसौख्य, आरोग्यसौख्य यांसारख्या सुखापासून वंचित राहतो. समाजात आपण कित्येक उदाहरणे बघतो की भ्रष्टाचाराच्या मार्गाने तात्पुरते सुख देणारी लक्ष्मी पुढे कित्येक पिढ्यांचा सर्वनाश करून निर्गमन करते.

सन्मार्गाने मिळविलेली लक्ष्मी प्राप्त झाली की, त्या समृद्धीच्या सुखात रममाण न होता आराधना अविरत सुरू ठेवणे ही दुसरी महत्त्वाची अट. प्रापंचिक सौख्य मिळाल्यानंतर जन्म-मृत्यूच्या चक्रातून सोडविण्यासाठी त्या जगन्माता महालक्ष्मीची मी अखंड सेवा करीन, असा संकल्प भक्ताने करायला हवा. कुठल्याही प्रकारची ऐहिक समृद्धी शाश्वत नाही. अगदी स्वर्गसुखसुद्धा चिरकाल टिकत नाही. पुण्य क्षीण झाल्यानंतर जीवाला स्वर्गातून पुन्हा मर्त्यलोकात ढकलले जाते असे श्रीमद्‌भगद्‌गीता सांगते. आध्यात्मिक उन्नती, पारमार्थिक समृद्धी हीच खरी समृद्धी होय! परमार्थ म्हणजे परम ऱ् अर्थ; अर्थात विशाल असे धन, परमार्थ म्हणजे केवळ देवाचे नाव घेत बसणे असा संकुचित अर्थ नसून आध्यात्मिक समृद्धीसाठी केलेले ज्ञानयुक्त प्रयत्न. या आध्यात्मिक सुखाच्या प्राप्तीसाठीसुद्धा श्री आराधना करणे आवश्यक आहे. वैयक्तिक, सामाजिक, राष्ट्रीय आणि वैश्विक श्रीमंतीबरोबरच पारमार्थिक समृद्धीच्या मागणीचा संदेश, श्रीमहालक्ष्मीला कळवणे हे श्री आराधनेतील फलाशेचे सर्वोच्च गुपित आहे.

- बापट गुरुजी